REVIEW OF RESEARCH

# प्राचीन कालीन गोरबंजारा संस्कृतीचे अध्ययन

**श्री राजकुमार तुकाराम राठोड**

सहशिक्षक, रीसर्च स्कॉलर, एम.ए.एम.एड.सेट (शिक्षणशास्त्र)
जि.प.प्रा.शाळा लवुळ क्र.१ ता.माजलगांव जि.बीड, महाराष्ट्र.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## सारांश

प्राचीन कालीन गोरबंजारा संस्कृतीची वैभवशाली परंपरा असून याची नाळ सिंधू संस्कृतीशी जोडली गेली आहे. गोरबंजारा संस्कृती अत्यंत प्राचीन असून याचा उद्‌भव हडप्पा, मोहेंजोदारो तथा सिंधू घाटी संस्कृतीत आहे. प्रस्तुत संशोधनातून प्राचीन कालीन गोरबंजारा संस्कृतीचे अध्यायन करण्यात आले. सिंधू संस्कृती संदर्भात बंजारा लोकगीते, सिंधू संस्कृतीतील व्यापार पध्दती, सिंधू संस्कृतीच्या हडप्पा आणि मोहंजोदारो उत्खननात सापडलेली साहित्य, गोरबंजारा लोकजीवन पध्दती याचे संशोधनातून अभ्यास करण्यात आला. प्रस्तुत संशोधनातून सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे, प्राचीन कालीन गोरवंशाची ऐतिहासिक तथ्ये, गोरसंस्कृती आणि सिंधू संस्कृतीच्या साम्याचा शोध घेण्यात आला. प्रस्तुत संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला. मुलाखती, प्रत्यक्ष भेटी, संदर्भग्रंथ, शोधप्रबंध, रिसर्च जर्नल्स, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्र इत्यादी साधनाचा वापर करण्यात आला. सदर संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा वापर करण्यात आला. लोकसाहित्यामधे बंजारा लोकगीतांची परंपरा प्राचीन काळापासून असून ही लोकगीते जीवनाच्या प्रत्येक कमीसोबत जोडलेले आहेत. गोरबंजारे लेदेणी आणि बार्टर पध्दतीने व्यापार बैल,उंट,घोडे इत्यादीच्या साह्याने फार प्राचीन काळापासून करतात. प्राचीन काळात हर एक वस्तूची आयात निर्यात गारेवंशीयाव्दारे होत. सिंधू संस्कृतीच्या हडप्पा आणि मोहेंजोदारो उत्खननात सापडलेले साहित्य आजही तांड्यात उपयोगात आणली जातात. गोरबंजाराची वेशभूषा,केशभूषा,लोकजीवन,खाद्यसंकृती,नृत्य,उत्सव ,अलंकार,आभूषणे जशास तशी सिधू घाटी उत्खननात सापडली आहेत. गोर बंजारा हे सिंधू घाटी संस्कृतीचे आद्यवासी आहेत.

**शब्द सूची :** प्राचीन काल, गोरबंजारा, संस्कृती संशोधनाची उद्दिष्ट्ये:

## प्रस्तावना:

जगातील प्राचीन संस्कृतीपैकी भारतीय संस्कृती ही एक ओळखली जाते. भारतात अनेक संस्कृती, जाती, धर्म, वंश व परंपरा आहेत. भारतातील अनेक जातीवंशाचा अभ्यास मोठ्या प्रमाणात झाला असला तरी काही मागास जातीजमातीचा अभ्यास अद्याप दुर्लक्षीतच आहे. त्यातीलच प्राचीन जमातीपैकी बंजारा ही एक जमात आहे. भारतातील इतर संस्कृतीपेक्षा बंजारा संस्कृती वेगळी व वैशिष्ट्य पूर्ण आहे. जगात तसेच भारतातील सर्वच घटक राज्यात ही संस्कृती आढळून येते. बंजारा समाजाचे वैशिष्ट्ये म्हणजे एक बोलीभाषा, एक वेशभूषा, एक केशभूषा, रुढी, परंपरा, विधीसंस्कार, सण, उत्सव साजरा करण्याची पद्धती एकच दिसून येते. तसेच त्यांची न्यायपंचायत, नायक, कारभारी, लोकगीते या सर्वातून एक वेगळी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती पहावयास मिळते. आधुनिकीकरणाच्या काळात बंजारा समाजाने आपली संस्कृती टिकवून ठेवली आहे. बंजारा संस्कृतीच्या पाऊलखुणा, त्यांच्या मूळ अधिवास संशोधकाला शोधणे गरजेचे वाटले. बंजारा हे नाव इ.स.१५ च्या शतकात आले. त्यांचे मूळ नाव गोर होते. बंजारा ही गोरवंशीय जमात आहे. गो म्हणजे गाय. र म्हणजे रक्षा. गाईची रक्षा करणारे. गायी, बैलांना म्हणजे गोधन पूजतात. गोर बंजारे पूर्वी पासूनच निसर्गपूजक समाज आहे. आजही या रुढी परंपरा या समाजात चालत आहेत. जे की सिंधू घाटी संस्कृतीच्या हडप्पा, मोहंजोदारो उत्खननात सापडल्या

सिंधू संस्कृती जगातील फार प्राचीन संस्कृती असून त्याची नाळ गोरबंजारा संस्कृतीशी जोडलेली आहे. सिंधू घाटीतील हडप्पा व मोहंजोदारो या विशाल, सुंदर स्वच्छ व समृध्द संस्कृतीच्या निर्मात्यापैकी गोरबंजारा प्रमुख समाज आहे. गोरबंजारांचा इतिहास लिखित स्वरुपात नाही परंतु मौखिक स्वरुपात आहे. लोकगीते म्हणी, केंळावट, साखी इत्यादी मध्ये जिवंत आहेत. ही लोकगीते जीवनाच्या प्रत्येक कर्मासोबत जोडलेली आहेत. गोरबंजारा जमात. इ.स.पु.८००० वर्षापुर्वी पासून बैलाच्या पाठीवर सामान लादून लदेणी आणि व्यापार करत आला आहे. त्याचा हा

LBP PUBLICATION

व्यापार भारतात तसेच भारताबाहेरील देशात चालत असे त्यांना सीमांच बंधन नव्हते. सिंधू घाटी संस्कृतीच्या हडप्पा आणि मोहंजोदारो उत्खननात सापडलेले साहित्य, घरेलू वस्तू, अलंकार, आभूषणे इत्यादी बंजारा समाजातील साहित्याशी पूर्णतः मिळते जुळते आहे. गोरबंजारा तांड्यात आजही हे साहित्य वापरतांना आढळतात. सिंधू घाटी उत्खननात सापडलेल्या मणख्या व हरपणी या बंजाऱ्याच्या मूर्त्या, नृत्य करणाऱ्या सामूहिक बंजारा वेशभूषेच्या मूर्त्या, बैलाच्या पाठीवर सामान लादलेल्या मूर्त्या, कळस, धडधडी, चोखो इत्यादी वरुन गोरबंजारा सिंधू घाटी संस्कृतीचे आद्यवासी असल्याचे दिसून येते. गोरबंजारे निसर्गप्रिय समाज आहे. खाद्यसंस्कृतीत दळाई बाटी, सळोई घुगरी, चावळी, पातळी बाटी, चिकन करी, लापड, गहू चा अन्नपदार्थात समावेश होतो. सिंधू पूर्व काळापासून गोरबोली, अफगणिस्तान, सिंधू, पंजाव, गुजरात, काठेवाडा, हडप्पा आणि मोहेंजोदारो मध्ये बोलतात. भारतात सर्वत्र बंजारे गोरबोली बोलतात. सिंधू संस्कृतीच्या मूळच्या आद्यवासी गोरबंजारावर सिंधू घाटीत गोर बंजारा व्यापारात व्यस्त असताना शस्त्रधारी, आर्यन, पर्सियन, कुशाण, हुणस यांनी सतत आक्रमणे करुन गोरबंजाराचा इतिहास नष्ट केला. तेथील लोकांची निर्घृण हत्या केली. गोरबंजारावर खूप अन्याय झाला. त्यानंतर ते जगात इतरत्र पसरले. उदयपूर, बंगाल, अजमेर,मध्य प्रांत, प्राचीन गंधार भागात गोरवंशीयांचे राज्य असल्याचे अनेक पुरावे आढळतात. गोरबंजारा व सिंधू घाटी संस्कृतीत मोठ्या प्रमाणात साम्य आढळून येते. गोरबंजारा संस्कृतीची ऐतिहासिक पार्श्वभुमी, सिंधू संस्कृती संदर्भात बंजारा लोकगीते, सिंधू संस्कृतीतील व्यापार पद्धती, हडप्पा, मोहंजोदारो उत्खननात सापडलेले साहित्य, गोरबंजारा लोकजीवन पद्धती, सिंधू संस्कृती ऱ्हासाची कारणे, प्राचीन कालीन क्षत्रिय गोरवंशाचे ऐतिहासिक तथ्ये प्राचीन कालीन गोरबंजारा संस्कृती व सिंधू घाटी संस्कृतीतील साम्याचा शोध घेणे, यांचे अध्यायन करणे. या अनुषंगाने प्राचीन कालीन गोरबंजारा संस्कृतीचे अध्ययन या संशोधनातून करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे :**

१) प्राचीन कालीन गोरबंजारा संस्कृतीचे अध्ययन करणे.
२) सिंधू संस्कृती संदर्भात बंजारा लोकगीतांचा अभ्यास करणे.
३) सिंधू संस्कृतीतील व्यापार पध्दतीचा अभ्यास करणे.
४) सिंधू संस्कृतीच्या हडप्पा आणि मोहंजोदारो उत्खननात सापडलेल्या साहित्याचा अभ्यास करणे.
५) गोरबंजारा समाजाच्या लोकजिवन पध्दतीचा अभ्यास करणे.
६) सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे शोधणे.
७) प्राचीन कालीन क्षत्रिय गोरवंशाच्या ऐतिहासिक तथ्याचा शोध घेणे.
८) प्राचीन कालीन गोरबंजारा संस्कृती व सिंधू संस्कृतीच्या साम्याचा शोध घेणे.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला. मुलाखती, प्रत्यक्ष भेटी, संदर्भग्रंथ, शोधप्रबंध, रिसर्च जर्नल्स नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्र इत्यादी साधनाचा वापर करण्यात आला.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी एकतिहासिक पध्दतीचा वापर करण्यात आला.

**संशोधनाचे महत्व :**

प्राचीन कालीन गोरबंजारा संस्कृतीची माहिती अवगत होणे. सिंधू संस्कृतीतील लदेणी आणि बार्टर पध्दतीच्या व्यापाराची माहिती होईल. सिंधू संस्कृतीच्या हडप्पा आणि मोहंजोदारो उत्खननात सापडलेले साहित्य आणि गोर बंजाराकडे उपलब्ध असलेले साहित्यातील साम्य शोधण्यास मदत होईल. गोरवंशीयाचे एकमेव अव्दितीय लोकजीवन पध्दती, रूढी, परंपरा, उत्सव आणि सिंधू घाटीतील लोकजीवन पध्दतीची माहिती होईल. सिंधू घाटीच्या ऱ्हासाची कारणे शोधण्यास मदत होईल. प्राचीन कालीन क्षत्रिय गोरवंशाच्या ऐतिहासिक तथ्याची माहिती होईल. गोरबंजारा संस्कृती व सिंधू संस्कृतीतील साम्याचा शोध घेता येईल या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

**संशोधनाची आवश्यकता :**

गोर बंजारा समाजाला त्यांच्या मूळ ऐतिहासिक पार्श्वभूमीची माहिती व्हावी. गोरवंशीयाचा इतिहास लिखित स्वरूपात उपलब्ध नसून दंतकथा, केळांवट, कहानी, लोकगीतातून गोरबंजाराच्या इतिहासाचे दर्शन घडते. सिंधू संस्कृतीच्या हडप्पा आणि मोहेंजोदारो उत्खननात सापडलेले साहित्य आणि गोर बंजाराकडे उपलब्ध साहित्यातील साम्य शोधणे, गोरबंजारा लोकजीवन पध्दतीतील साम्य शोधणे, सिंधू संस्कृती ची ऱ्हासाची कारणे, क्षत्रिय गोरवंशीय ऐतिहासिक तथ्यांची माहिती, गोबंजारा समाजाच्या प्राचीन संस्कृतीचे ज्ञान व्हावे यासाठी संशोधकाला प्रस्तुत करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

**१) गोरबंजारा संस्कृती :-**

सिंधू संस्कृती जगातील फार प्राचीन संस्कृती आहे. या संस्कृतीची नाळ गोरबंजारा संस्कृती शी जोडलेली आहे. सिंधू घाटीची वेशभूषा आजही बंजारा स्त्रिया घालतात सिंधू संस्कृतीतील हडप्पा व मोहेंजोदारो येथे बंजारा मूळ निवासी असल्याचे पूरावे देखील सापडले आहेत. प्राचार्य गबरुसिंग राठोड म्हणतात, वास्तविक पाहता इ.स.पू.५००० वर्षापूर्वीची सिंधू घाटीची म्हणजे मोहेंजोदारो व हडप्पा यास विशाल,सुंदर स्वच्छ व समृध्द संस्कृतीच्या निर्मात्यापैकी गोरबंजारा समाज हा प्रमुख समाज आहे. इ.स.पू.५००० मध्ये सिंधू नदीच्या व तिच्या उपनद्याच्या काठावर राहणाऱ्या सर्व बहुजन समाजाची संस्कृती, सभ्यता, जीवनशैली ही आजची ब्राम्हणवादी (हिंदूत्ववादी) नव्हती. त्यांची द्रविड व नाग संस्कृती व श्रमण जीवनशैली होती. हे सर्व निसर्गपूजक व सिंधू परिसरातील क्षेत्राचे मालक, रहिवाशी व राजेमहाराजे होते.१

**२) बंजारा चा इतिहास लोकगीतात आजही जिवंत :-**

भारतीय प्राचीन इतिहासात इ.स.पू.१२५० मध्ये गोर आणि गोरविती महाऋषी होऊन गेले पाठांतर करणे बंजाराची विशेषता आहे. ते म्हणतात, 'लको जकोण मिट जाव, हारद कर जो हारद रेजोव.' म्हणजे लिहिलेले मिटू शकते पण मुखोद्‌गत केलेले पीढी दर पीढी जीवित राहते. गोर बंजारांचा इतिहास लिखीत रुपात नाही परंतु मौखिक रुपात आज ही लोकगीत म्हणी, कथा,लेंगी, केळांवट इत्यादीमध्ये जिवंत आहे. लोकसाहित्यामध्ये बंजारा लोकगीतांची परंपरा प्राचीन काळापासून पाहायला मिळते. लोकगीतांची शब्दसंपदा भाषा सोबत त्यांचे अस्तित्व कायम आहे. त्यामुळेच बंजारा लोकगीतांचा प्रवाह पिढ्यान पिढी आजपर्यंत चालत आला आहे. लोकगीत आपली सहजता, सरलता आणि अनुभवांची तीव्रता यामधून लोकमानस च्या हृदयाच्या धडकनमध्ये राग-संगीत भरुन देतो आणि त्यांचे रोम रोम झंकृत होऊन जाते. ही लोकगीते समाजिक आदान-प्रदान मशालीसारखी रोशन करतो. ही लोकगीते जीवनाच्या प्रत्येक कर्मासोबत जोडलेली आहेत. यामध्ये घटीपरेरं गीद, तीजेर गीद, होळीद गीद, दवाळीर गीद, देवीदेवतांचे गीद,वायार गीद इत्यादी पूर्वजांच्या विरासतमध्ये मिळाले आहे. बंजारा ही खंडप्राय देशाची एक गैरवशाली जमात आहे. जिचा प्राचीन इतिहास त्यांच्या रहन-सहन, खान-पान, देवी-देवता, पूजा-अर्चा, जश्न-त्योहार मध्ये लपलेला आहे.

बंजारा त्यांची संस्कृती, धार्मिक प्रथा, सामाजिक-सांस्कृतिक आणि राजनितीक शासन, भौगोलिक प्रसार आणि बंजारा चा इतिहास प्राचीन सिंधू संस्कृतीत दफन केल्या गेला. इतिहासातील दंत कथा आणि कहानी, लोकगीतातून बंजाराच्या इतिहासाचे दर्शन घडते.२

बंजारा लाकगीतांचे विश्लेषण केल्यावर निष्कर्ष निघतो की, बंजारा संस्कृती ची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. याचा उद्‌भव हडप्पा संस्कृती मोहंनजोदारो संस्कृती तथा सिंधू संस्कृतीत आहे.

बंजारा बोलीमध्ये हडप्पा नगरीला 'हरपळी नगरी' या नावाने संबोधित केले गेले आहे.या संदर्भात आपल्याला हे लोकगीत मिळते.

नगरी वसतीन साई वेस,

आन-धन देस,
मारे नायक बापूरी नगरी हवेली.
खाये पियेसी नगरी.

येथे नगरी चा अर्थ आहे हडप्पा नगरी आहे. बंजारा समाजात स्त्रीयांना हरपंळी म्हणतात. हरपळी चा बंजारा बोलीत (गोरबोलीत) अर्थ आहे हडप्पा येथे राहणारी.

या संदर्भात हे लोकगीत मिळते.

मारी हरपळी याडी
मारी हरपळी बाई
मारी हरपळ नायकणं
याचा असा अर्थ आहे की,

माझी हडप्पा येथे राहणारी आई, माझी हडप्पा येथे राहणारी बाई, माझी हडप्पा येथे राहणारी नायकणं.३

बंजारा समाजातील होळी उत्सवातील लेंगी या लोकगीत प्रकारातून सुध्दा गोर बंजारे हडप्पा व मोहंनजोदारो येथील रहिवाशी असल्याचे स्पष्ट होते.

वड फुंदी मारे मोहनारो देस,
वड फुंदी मारे मोहनारो देस ,
मारे मोहनारी खबर लिया फुंदी,

फुंदी वड वड जो.
मारे नायकेरी खबर लिया फुंदी,
फुंदी वड वड जो.

वड फुंदी मारे हडप्पारो देस,
वड फुंदी मारे हडप्पारो देस,
मारे हडप्पारी खबर लिया फुंदी,
फुंदी वड वड जो.
मारे नायकेरी खबर लिया फुंदी ,
फुंदी वड वड जो.

हे फुलपाखरा तु उड माझ्या मोहना नगरीत जा आणि माझ्या मोहनानगरीची खबर घेऊन ये, माझ्या नायक बापूची खबर घेऊन ये. हे फुलपाखरा माझ्या हडप्पा नगरीत जा आणि माझ्या हडप्पा नगरीची खबर घेऊन ये. माझ्या नायक बापूची खबर घेऊन ये.

### ३) लदेणी आणि बार्टर पध्दतीचा व्यापार सिंधू संस्कृतीत :

बंजारा मूळ सिंधू घाटी संस्कृती असावी कारण ते लदेणी आणि बार्टर पध्दतीने व्यापार बैल, उंट, घोडे इत्यादी च्या साहय्याने वैदिक काळापासून करत.

सर मार्शल यांनी 'इंडस सिव्हीलायझेशन' पूस्तक लिहिले. गोर संस्कृतीचा इतिहास सिंधू घाटीत दडलेला असल्याचे सांगितले. उत्खननात मोहंनजोदारो येथे सापडलेले ३१x२३x८ feet चे तलाव हे आंघोळीसाठी नसून गोर चे लदेणी केलेल्या बैलाला पाणी पिण्यासाठी वापरले जात. पायऱ्या समांतर असल्याने त्यांनी पाणी पिण्यास सोपे जात. बैलाच्या पाठीवरील लदेणी वजनदार असल्याने माल वारंवार उतरविणे, चढविणे कठीण असायचे त्यासाठी अशी व्यवस्था केली होती. या तलावाच्या शेजारी १५० फूट लांब व ७५ फूट रुंद धान्य साठविण्याचे कोठार सापडले आहे. शेजारीच एक गोदी सापडली. धान्य साठवणूक, वितरण व लदेणी सोपी जावी यादृष्टीने रचना केल्याचे आढळते. याचा अर्थ नि:संशय गोरवंशीयांनी ही तलाव व धान्य साठवणूक बांधले असल्याचे स्पष्ट होते. अशाच प्रकारची तलाव व धान्य साठवणूकीची रचना हडप्पा मध्ये असल्याची सापडली आहे.४

मध्ययुगीन काळात अशाच प्रकारचे तलाव अफगाणिस्तान, राजस्थान, गुजरात मध्ये बांधले गेले आहेत. त्यांना बंजारा बावडी म्हणतात. बंजारा संस्कृतीत ज्यादा तर लोक गाय-बैलाचा वापार करत. त्या कारणाने बंजारा समाज हा पूर्वी गोर समाज म्हणून ओळखल्या जात. इ.स. १४६९ ते १५२० मध्ये नानकाच्या काळात बंजारा नाव उत्पन्न झाले असेल. बंजारा हे मूळ गोरवंशीय आहेत.

गोर जातीचा सर्व प्रथम उल्लेख राहूल सांस्कृत्यायन याने 'वोल्गा से गंगा' या ग्रंथात केला. ते म्हणतात, ''इ.स. पूर्व सव्वा दो सौ पिढी पूर्व और गोर जातीयाँ पायी जाती है ! म्हणजे १ पीढी २५ वर्षाची समजली तर सव्वादोनशे पीढी म्हणजे इ.स.पू. ५६२५ वर्ष जुना गोर जातीचा इतिहास आहे.''5 प्राचीन काळात हर एक वस्तूची आयात निर्यात बंजाराव्दारे होत. सिंधू घाटी ला जोडलेली गोर बंजारा संस्कृती आहे.

संपूर्ण देशातील बंजारा आपणास गोर म्हणून घोषित करतो. गोर शब्दाची उत्पत्ती गो म्हणजे गाय आणि र म्हणजे रक्षा. गाईची रक्षा करणारे. गोर वंशात (बंजारात ) गाईची पूजा अर्चा आजही करतात. तांड्यात देवाच्या नावावर एक बैल सोडण्यात येतो. त्याला सांड, कठाळ्या किंवा गराशा म्हणतात. त्याच्याकडून कोणते काम करुन घेत नाहीत. सद्यस्थितीत तांड्यात असा बैल आजही दिसून येतो. याचाच अर्थ गोरवंशी लोक बैलाला पूजतात. गोर बंजारा बैलाच्या पाठीवरुन लदेणी करत.६ प्राचीन भारतात गोरवंश एक क्षत्रिय वंश होता. काबूलच्या पूर्वेस गोर नदी, गोर गाव पण आहे. प्राचीन काळात या सर्व भागात गोर म्हटले जात असत. चित्तेगडच्या उदयसिंहच्या कालखंडा पर्यंत गोर हा शब्द सर्रास रूढ झालेला आढळतो. नंतरच्या कालखंडात गोरवंश हा बंजारा या शब्दाने आढळतो. ७ लमाण हे नाव बंजारा नावाच्या फार पूर्वी पासून आहे. लमाण गोरबंजारा हे राज्यस्थान व भारताच्या विविध भागात वास्तव्य करण्यापूर्वी अफगाणिस्तान येथून आले असे काही संशोधक मानतात.८ इ.स. पू. ३००० वर्षापासून आज २१ व्या शतकापर्यंत गोरवंशी गोपालन करतात. गोधन पूजा आजही दिवाळीच्या वेळी लक्ष्मीपूजेच्या रुपात तांड्यामध्ये केली जाते त्या सबंधी लोकगीत

आये हुँ, गाई गोदा पूजये तू
गाई गोधन पूज ९
खेवाड्या मेवाड्या बांड्या बुच्या
घोडेरी कसारे लांबी हारे, धोळी हारे

छादळासे कानेर, टोकंळीसे मातेर
कुडा भरो घी, तलावडी भरो छांज
आन धन लाव लस्कर घणं घणं
देस दवाळी माता.
कुंवाऱ्या मुली आशीर्वाद मागतात.१०

मोती चंद्र यांनी सार्थवाह ग्रंथात सिंधू घाटीपासून ११ व्या शतकापर्यंत भारतीय व्यापाराचा इतिहास लिहिला आहे. सिंधू घाटीपासून जल, स्थल वर जो व्यापार चालत त्या व्यापारी नायकास सार्थवाह म्हणत असत. सार्थवाह वर्गाचा प्रमुख गोर बंजारा होते. रामशरण शर्मा यांच्या 'प्राचीन अर्थव्यवस्था' ग्रंथात मालवाहक बैलाचा संदर्भ येतो. सिंधू घाटीपासून १२ व्या शतकापर्यंत बैलाच्या पाठीवर सामान लादून ने-आण करण्याचे काम मुखतः बंजारे करत. बंजारा जवळ मालवाहक तथा ट्रान्सपोर्ट साठी लाखो बैल राहत होते. असे संदर्भ सिंधू घाटी सभ्यता, ऋग्वेद, वैदिक युग, बौध्द जातक कथा, जैन, मौर्य, गुप्त पासून बाबर, अकबर, जहाँगीर, औरंगजेब, शिवाजी महाराज, बाजीराव पेशवे तथा टिपु सुलतान, इंग्रज येईपर्यंत मिळतात.११

### लमाणमार्ग:-

इतिहास तज्ञ एस.आर. कानिटकर ने 'हिस्ट्री ऑफ इंडिया' ग्रंथात लमाण मार्ग चा नकाशा दिला आहे. तो काळ इ.स.पूर्व ६०० ते ४०० चा आहे. या मार्गावरच इंग्रजांनी रेल्वे पटरी बसविल्या. सर्व राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, व्यापारी मार्ग गोर ने शोधलेले आहे. या मार्गचा वापर करुनच ते बैलाच्या पाठीवर लदेणी लादून व्यापार करायचे. त्यांना देशाच्या सीमाचा बंधन नव्हतं. कारण त्यांचा व्यवसाय, लदेणी, व्यापार, वाणिज्यक हा होता.१२

### ४) हडप्पा,मोहंनजोदारो उत्खनन :

दयाराम सहानी यांनी हडप्पा येथे १९२१ मध्ये व राखाल बॅनर्जी यांनी मोहंनजोदारा येथे केलेल्या उत्खननामुळे एका समृध्द व विकसित संस्कृतींचा शोध लागला. एम.एस. वॅटस यांनी हडप्पाचे आणि जॉन मार्शल यांनी मोहंनजोदारोचे उत्खनन पूर्ण केल्या नंतर या संस्कृतीचे स्वतंत्र आस्तित्व जगाच्या निदर्शनास आले.

**सिंधू संस्कृतीच्या हडप्पा आणि मोहेंनजोदारो उत्खननात सापडलेल्या साहित्यावरुन गोर बंजारा जमात सिंधू सांस्कृतीतील अद्यवासी :-**

भारतीय संस्कृतीचा इतिहास हा बऱ्याच प्रमाणात सिंधू संस्कृतीवर आधारीत आहे. सिंधू संस्कृतीच्या हडप्पा आणि मोहेंजोदरो या नगरात सापडलेल्या साहित्यावरुन बंजारा जमात ही सिंधू संस्कृतीत असल्याचे स्पष्ट होते. बंजारा समाजातील साहित्य हे सिंधू संस्कृतीत मिळालेल्या साहित्याशी मिळते जुळते आहे.

सिंधू संकृतीचे गोढे अभ्यासक प्र.रा.देशमुख यांनी 'सिंधु संस्कृती, ऋग्वेद व हिंदू संकृती' या ग्रंथात बंजारा जमात ही सिंधू संकृती काळापासून असल्याचे म्हटले आहे.१३

### a) हडप्पा उत्खननात मिळालेल्या बंजारा पुरुष स्त्रीयांच्या मूर्त्या :

| | |
|---|---|
| मणख्या (पुरुष) | हरपणी (स्त्री) |
| बंजारा जमातीत पुरुषाला मणख्या म्हणतात. | हरप्पा येथे राहणारी बंजारा स्त्री म्हणजे हरपणी |

सिंधु घाटातील बंजारांच्या मूर्त्या मिळालेल्या आहेत. बैलाच्या पाठीवर समान लादलेल्या मुर्त्या हडप्पा उत्खननात मिळाल्या. बंजारा जमात इ.स.पु.८००० पूर्वी पासूनच बैलाच्या पाठीवर सामान लादून लदेणी करत आला आहे.

### b) उत्खननात मिळालेल्या घरेलू वस्तू :

नंगरा, कचोळो , ढाकणी, टोबा कासेर थाळी, चीपा, काटोठी, मुसळ, उखळी, कडचो, बतकडी, मद्दमाना, हांडी इत्यादी घरलू वस्तू मिळाल्या. ह्या वस्तू तांड्यामध्ये आज ही आढळतात. तांड्यातील गोर बंजारा लोक या घरेलू वस्तू आजही वापरतात.

**c) सिंधू घाटी उत्खननातून मिळालेल्या वस्तू :**

पट्टी/सडक, सारंगी, मुंगरी, जंब्या, छरी, इत्यादी वस्तू सिंधू घाटी उत्खननात मिळाल्या आजही तांड्यातील बंजारा लोक या वस्तू वापरतात.

**d) उत्खननात मिळालेल्या वापरातील वस्तू :**

घडीया, डुवा, दाटो (झकण), घटी (चवकी) रांधन (पिण्याचे पाणी ठेवण्यासाठी ), दामणी (जनावरांना बांधुन ठेवण्याची व्यवस्थ), गळ, वासळी (पैसे ठेवण्याचे कंबरेवरचे पाकेट) आजही तांड्यात याचा उपयोग केला जातो

**e) सिंधु घाटीत उत्खननात सापडलेल्या सप्त धातूच्या देवीच्या मूर्ती, कळस, धडधडी, चोखो :**

सिंधु घाटी उत्खननात मिळालेल्या सप्तधातूच्या देवाच्या मूर्ती तथा निम्नमूर्ती आजही तांड्यात सापडतात. कळस, धडधडी, चोखो इत्यादी. चोखो मध्ये आजही पूजा करतांना बंजारे शेणाने सारवून घेतात त्यानंतर त्यावर पीठाने पृथ्वी चा आकार गोल काढतात त्याचे चार भाग करुन मधोमध पितळेचा तांब्या भरुन पाणी ठेवतात त्यावर कडु निंबाच्या फांद्या नारळ ठेवतात तसेच शेजारी कोडी, धान्य,पैशे, अग्नी ठेवतात व चोखो पूरुन त्याची पूजा करतात. ह्याला चोखो पुरणे असे म्हणतात. जे की सिंधू संकृती उत्खननात आढळून आले ते आजही तांड्यात अशी पूजा करतात. हातात दिवा घेवून मुली आजही तांड्यात दिवाळीला लक्ष्मीपूजनावेळी कुंवाऱ्या मुली आशीर्वाद मागतात.१४

**f) उत्खननात सापडलेली नृत्य करणाऱ्या महिलेची प्रतिकृती :-**

नृत्य करणाऱ्या सामुहिक महिला प्रतिकृती हडप्पा येथे सापडली. जिने घागरा, हातात हस्तीदंताच्या भरपुर बांगड्या, डोक्यावर शिंग आणि कपडा परिधान केला आहे. जगामध्ये फक्त गोर बंजारातील स्त्रीयाच हातामध्ये मनगटापर्यंत पुर्णतः हस्तीदंताच्या बांगड्या व डोक्यावर शिंग लावतात. डोक्यावर शिंग लावण्याचे कारण म्हणजे गोर बैलांना पूजतात. जे सिंधू संकृतीत आढळून आले आजही गोर महिला तांड्यात घागरा,काचळी, हातात हस्तीदंतासारख्या बांगड्या, डोक्यावर चांदीचे शिंग व कपडा परिधान करतात.

सर मार्शल ने जी साहित्याची यादी दिली ती आजही तांड्यात उपलब्ध आहे. हांडी, घडीया, चीपा,ओसक्या,ढाकणी, तलवार, कराडी, जंबिया, items of clay, मुसळ, मुंगरी, डांग, शिकारीची काठी, दारु साठविण्यासाठी बतकडी . तांड्यात या वस्तू वापरल्या जातात ज्या सिंधू घाटी संस्कृतीच्या उत्खननात सापडल्या.

**५) लोकजीवन :**

**a) वेशभुषा**

**पुरुष :-**

प्राचीन काळात पुरूषही केशभुषा आणि अलंकाराचे शौकिन होते. कृर्ता - बाराबंडी, खांद्यावर रुमाल, डोक्यावर लाल केशरी रंगाची पगडी २० मीटर लांब, हातात चांदीचा कडा, चांदीची साकळी, पारा धातूची साखळी, कळंदोरी, पैसे ठेवायला वासळी (कमरपट्टा), केस विशिष्ट पध्दतीने करत त्यास झल्पा म्हणत. मिशा, दाढी, माणिक, मोती, कोडी, शिंप, हस्तीदंत मुंगा, पारा इ. पासून बनविलेले नखशिखांत गहने वापरत. वरील सर्व सिंधू घाटीच्या उत्खननात सापडले आहे.

**स्त्री:-**

बंजारा स्त्रीयांना आपली आभूषणे वेशभूषा तथा सजनेधजन्यावर मोठा नाज आहे.

एडी मारी चिकणी, जैसे सैधा सूंठ
ऐसी झुमती चाल, रंडवा छाती कुट
आटी डोराकांगसी, गुंथवा जाय
सामे मिल गया सायबा, छाती धडका जाय

उत्खनन मध्ये प्राप्त गहने आजही गोर बंजारा स्त्रीया घालतात. मोहजोदारो मधून प्राप्त गहने आणि आभूषणे आजही बंजारा स्त्रीयांच्या गळ्यात सुरक्षित आहे.

**b) आभूषणे:-**

घुगरी, टोपली, वाकडी, हासली, गोप, कानखोरा, फुलीया, विटी, चटकी, अगंतुका, कलडा, मलीया, लगभग ५०० दागिण्यांचे तुकडे मिळाले हे तांड्यामध्ये स्त्रीया आजही घालतात. ही आभुषणे बंजारा सनारच बनवितो. हातात दंडापर्यंत हस्तीदंनाच्या बांगड्या, डोकयावर शिंग

आजही स्त्रीया घालतात. घागरो, पांबडी, फेटिया, काचळी, छाटिया, बालिया, कस्तुरिया, भूरिया. चोटला इत्यादी वेशभूषा परिधान केलेली बंजारा स्त्री आजही तांड्यात आढळून येते. ही सिंधू घाटीची वेशभूषा आजही बंजारा नारी घालतात.

**c) नृत्यः-**

सिंधू घाटी उत्खननात ढोल, डफ, नगारा, लाकडाची बनविलेली सारंगी जी धाडी बंजारे वाजवितात, हंसणे रडणे, ढावलो मधूर स्वर हे धाडी बंजारा सारंगीतून काढण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे.१५

**d) गोर बोलीः-**

भारतात गोरबोली जवळपास ९ कोटी लोक बोलतात. सिंधू पूर्व काळापासून गोरबोली अफगाणिस्थान, सिंध, पंजाब, गुजरात, केठवाडा, हडप्पा आणि मोहंजोदारो मध्ये बोलताना. बंजारा हिंदी व संस्कृत सहज समजतात. बंजारे इंडो-आर्यन फॅमिलीतील असावेत असे काही संशोधक मानतात कारण गोरबोली व हिंदी, संस्कृत भाषा यात मोठ्या प्रमाणात साम्य आहे.१६

**e) निसर्गपूजक बंजारेः**

सिंधू संस्कृतीतील रूढी, परंपरा मोठ्या प्रमाणात गोर बंजारा संस्कृतीतून दिसून येतात. १७ सिंधू संस्कृतीत पृथ्वी, शिंग, वृषभ, पशू पालन लिंगपूजा यांना महत्व दिले जात. तशाच प्रकारे बंजारा समाजात पृथ्वी, सुरज, अग्नी, जल, कडुनिंब ची फांदी ची पूजा करतात. बंजारा समाज हा निसर्गपूजक समाज आहे. सिंधू संस्कृतीत निसर्गपूजक लोक होते हे उत्खननात सापडलेल्या पुराव्यावरुन आढळून येतो. त्याचप्रमाणे बंजारा जमात निसर्ग पूजेला महत्त्व देतो.

तो पशु पक्ष्यांना आपल्या परिवाराचा सदस्य मानतो.
झाडी मारी याडी, डुंगर मारो बापू
उंडे खोळाम मोर वीरा बोलये या १८

जंगल झाडी माझी आई, पहाड माझे पिता, पहाडीच्या दरीत बोलणारा मोर माझा भाऊ आहे. कळस, चोखो, धडधडी (बकराबळी) या प्रथा आजही बंजारा समाजात आढळून येतात. जे की सिंधू घाटी संस्कृतीत उत्खननात सापडल्या.

**निसर्गप्रिय बंजारेः-**

दिवाळीच्या वेळी लांबडी तृणाशी बंजारा मुलीने साधलेला संवाद-

ये कुणे वजाये रंगी वासळीये भूरीया
कुणे शिडायो तारो ढाबळो ये लांबडी
ये कुणे लागायो लांबी डोर

**श्रावणसरी**

झरमरीया वरसोये नानी मोटी बुंदे
रंग रंगडा रंगरीये लोवडीरो भाते धडा

झिरमिर झिरमिर येणाऱ्या श्रावणसरी ह्या नुसत्या सरीचा नाहीत तर आकाशात श्रावणाचे ढग चितारणारा चितार आकाशात व धरतीवर अशी काही रंगसरंगती निर्माण करतो की जणू सुंदर लोवडी-ओढणीच ती.

**f) उत्सव :**

**तीज**

तीज उत्सवात गोर बंजारा मुली गहू नऊ दिवस उगविण्यासाठी ठेवतात. नवीन गव्हाची घुगरी करतात. गोर जेवणात गव्हापासून बनविलेल्या चपाती, पुरी, लापड, पातळी बाटी आणि चिकन करी हे पाहुण्यासाठी पाहुणचार असायचा. सिंधू घटी संकृतीत याचे पुरावे सापडतात.

### दिवाळी-गोदण पुजन

दिवाळीला कुंवाऱ्या मुली गोधन पूजन करतात. निसर्गातील लांबडी, वलाळ्यां,काशीफूल, मकोडा,ढाकडा,बरु, शेतातील इतर वनस्पती आणतात व लक्ष्मीपूजनाला हातात ढाकणी घेऊन दिवा लावून कुवांऱ्या मुली आशिर्वाद मागतात. आजही ही प्रथा गोर बंजारा समाजात आहे.

### g) खाद्य संस्कृती:-

दळीया बाटी, सळोई, घुगरी, चावळ, पातळी बाटी, चिकन करी, लापड, गहू इत्यादी अन्नपदार्थाचा सामावेश होतो.

### h) गोरवंशीय लोकजीवन एकमेव अव्दितीय:-

मोतीराज राठोड लिहितात की, ''गोरवंशीय लोकजीवन एकमेव अव्दितीय आहे. संस्कृती, जीवन जगण्याची शैली, खाद्यसंस्कृती, सण, उत्सव, पूजा, आवड नावड, नृत्य, लोकगीते, भाषा-गोरबाली, वेशभूषा, तांडाजीवन, रुढी परंपरा इत्यादी. एकंदरित बंजारा समाजाचे लोकजीवन तथा सामाजिक जीवन सारखे आहे.'' बंजारा समाजचे वैशिष्ट म्हणजे एकच बोलीभाषा- गोरबोली, एक वेशभूषा, एक केशभुषा, रुढी, परंपरा, विधीसंस्कार, सण-उत्सव साजरा करण्याची एकच पध्दत आढळून येते. तसेच त्यांची न्यायपंचायत त्यांचे नायक, कारभारी, एक वैधिष्ट्यपूर्ण संस्कृती पाहायास मिळते.१९

### ६) गोर बंजार सिंधू संस्कृतीचा ऱ्हास:-

बंजारा संस्कृतीचे मूळ सिंधू घाटांत इतक्या खोलवर आहे की, बंजारे सिंधू घाटीचे मूळ बासिंदे असल्याचे स्पष्ट होते. बंजारा स्त्रिया आजही सिंधू संस्कृतीसंबंधी लोकगीत गातात.

सिंधू नदी रे पालेम
सप्त सिंधू रे राळेम
आरीया दामडीया दाम लगायोरे
मारे सेना नायका.

आपणे मोहन नगरीन (मोहंनजोदारो) बाळताणी
कोलीया करनाके मारे सेना नायका
हाडप्पारे आसरेन कणा जांवारे सेना नायका २०

सिंधू नदीच्या पालामध्ये सप्त सिंधूच्या घाटीत आर्या दामडीयाने दमाड लावला रे माझ्या सेना नायका. आपल्या मोहनानगरीला (मोहंनजोदारो) जाळून कोळसा केला माझ्या सेना नायका हडप्पा च्या आसराला कधी जाऊ.

मोहंनजोदारो व हडप्पा येथे गोर बंजारा संस्कृती वास करत होती. प्रा. मोतीराज राठोड यांच्या Ancient History of Gor Banjara या ग्रंथात गोर बंजारा एक प्राचीन जमात असून इ.स.पू. ५००० ते ६००० मध्ये हडप्पा आणि मोहंजोदारो सिंधू घाटी संस्कृतीची मूळ आहे.

सिंधू घाटीत गोर बंजारा व्यापारात व्यस्त होते. परंतु शस्त्र धारी आर्यन, पर्सियन, कुशाण, हुणस यांची सततची आक्रमणे यामुळे त्यांचा इतिहास नष्ट झाला. या टोळ्यांची युध्द आक्रमणे यामुळे गोर बंजारावर खूप अन्याय झाला. त्यानंतर ते जगात इतरत्र पसरल्याचा उल्लेख आहे. गोर बंजारा सिंधू घाटीत वास्तव्यात असल्याचे पूर्वी मोठ्या प्रमाणात वैदिक काळात सापडतात.२१

मॉर्टीमोर व्हीलर म्हणतो की, उत्तरेकडून आलेल्या आर्यांनी सिंधू संस्कृतीवर आक्रमण करुन तेथील लोकांची निर्घृण हत्या करून ती नष्ट केली. सिंधू संस्कृतीतल्या मूळच्या आद्यवासी गोर बंजारावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी शस्त्रधारी आर्यांनी अन्याय केले.

इ .स.पू. २००० वर्षापूर्वी आर्य भारतात आले. वेदांना प्रमाण मानणाऱ्या आर्यांच्या संस्कृतीला वैदिक संस्कृती म्हणतात. सिंधु संस्कृतीच्या पतनानंतर भारतात वैदिक संस्कृतीचा उदय झाला. आर्य मूलतः कुठले याबाबत इतिहासकारांमध्ये मतभिन्नता आहे. टिळक आपल्या 'आर्क्टिक होम इन वेदाज' या ग्रंथात उत्तर ध्रुव आर्याचे मूळ वसतिस्थान मानले. पेन्का या जर्मन शास्त्रज्ञाने जर्मनी किंवा डॅन्यूब नदीचे खोरे आर्यांचे मूळ वसतीस्थान असावे असा सिध्दांत मांडला. मॉर्गन या इतिहासकाराने पश्चिम सैबेरीया आर्यांचे मुळ निवासस्थान मानले. नेहरिंग, थ्रॅडर, बी.के. घोष, दा.ध. कोसंबी, रामशरण शर्मा रामिल थापर या सर्वच अभ्यासकांनी आर्य बाहेरुन भारतात आले हे अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडलेले आहे.२२

## ७) क्षत्रिय गोरवंशाचा इतिहास:-

### a) उदयपूर चे गोरवंशीय राज्य :

उदयपूर राज्याच्या छोट्या सादडी गावापासूज दोन मैल दूर एका पहाडीवर भ्रमर माता मंदिराजवळ एक शिलालेख मिळाला.२३ हा शिलालेख संस्कृत भाषामध्ये असून यामध्ये १७ ओळी आहेत.

'मानव मणि कुलोध्द व वंश गोर क्षात्रि पदें.'
राजा सोम गोर धान्य सोम राजवर्धन पूत्र

राष्ट्रपूत्र चा पूत्र राजा यशोगुण यांने आपल्या माता च्या पुण्यस्मरणात हे मंदिर बनविले माद्य शु.४९१ इ.स. ५४१ इ.स. याने निश्चित होते.२४

### b) बंगालमधील गोर-

बंगाल त्रिपुरा भागात इ.स. ५ व्या शतकात गोरवंशाचे राजे होते. राजा गोपीचंद गोरवंशीय राजा होता. आजही बंजारा गीत गातात. राजपाट सोडून गोपीचंद राजा आपली आई मैनावतीच्या आग्रहामुळे जोगी बनतो.

गोपीचंद राजा जोग लियो
गोपीचंद राजारी माडी हवेली
माडी हवेली छोड दियो
गोपीचंद.२५

हुबळी गॅरेटियर वेस्ट बंगाल पान नं. ८५-८६ वर उल्लेख मिळतो की गोपीचंद राजा राज्य करीत होता.

राजा गोपीचंद च्या वंशातील शंशाक नावाचा पराक्रमी राजा होऊन गेला. शंशाक चे मूळ नाव सोमा होते. इ.स.६०६ ते इ.स.६३८ त्रिपुरा ते हुबळी जंगली भागात ३२ वर्षे राज्य केले. चिनी प्रवासी युआन ह्युनच्या प्रवासवर्णनात उल्लेख मिळतो. बंगाल मध्ये गोरवंशी यांचे राज्य होते यावरुन सिध्द होते. बंगाल त्रिपुरा मधील बंजारा आजही आपली जात गोर म्हणून लावतात.

### c) मध्य प्रांतात- गोर सेनापतीचे राज्य:

एका गोर सेनापतीचे मध्य प्रांतात डोंगराळ भागात राज्य स्थापन केले. हे गोर राज्य ७०० वर्षे चालले. इ.स. १८०९ मध्ये सिंधिया ने यांचे राज्य जिंकून घेतले. राधिकादास गोर गोरवंशाचा शेवटचा राजा होऊन गेला अजमेरचे गोर शुरता वीरता करीता प्रसिध्द होते.

### d) प्राचीन ऐतिहासिक तथ्ये :

#### प्राचीन वास्तू:

काबूलच्या पश्चिमेस गोर जमात मोठ्या प्रमाणात राहत असल्यामुळे गोर प्रांत, गोर पहाडी आजही प्रसिध्द गोर गावाचे नाव आहे. गोर बंजारा स्त्री वेशभूषा अफगाणिस्तान गोर प्रांतात आजही सुरक्षित आहे. २६ गोर प्रांतातील गोराबुर्जे वास्तू, पिरीया बंजाराने बांधलेली पिलीभिती नावाची भिंत , गोर - बादल महाल, जयमल फतेमल स्मारक, बंजारा छत्री, उदयपूर तलावाचा कठडा, बंजारा हिल प्राचीन इत्यादी. प्राचीन वास्तू बंजारांनी निर्माण केलेल्या आहेत.

#### नाणे व शिक्के-

राजे महाराजे चलनासाठी स्वतंत्र चलन चालवित. एक नाणे सापडले आहे. त्यावर एका बाजूला वृषभ बैलाचे सिंग व दुसऱ्या बाजूला गोर विजय असे लिहिले आहे.

यावरुन हे स्पष्ट होते की, हे नाणे गोर वंशियाचे होते. प्राचीन गंधार प्रदेशात अनेक शिक्के सापडले ह्यावर सुध्दा बैल चिन्ह आणि त्यांचे सिंग आहे. सिंगाचे प्रतिक म्हणून आजही गोर बंजारा स्त्रीया डोक्यावर सिंग लावतात. सिंधू संस्कृती उत्खननात सूध्दा स्त्रीयांच्या डोक्यावर सिंग आढळते.

#### शिलालेख-

छोटी सादडी व मंदा सौर येथील शिलालेख सापडले ज्यात गोर राजे असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

**वाड्.मयः**

धार्मिक वाड्.मय - लोकसाहित्य, लोकप्रथा, रुढी मध्ये व लौकिक वाड्.मय- वेदकथा, लोककथा, साकी, केळांवट, म्हणी, लोकसंस्कार, जन्म, विवाह, मृत्यू संबंधी लोकसाहित्यातून गोर राजे असल्याचे कित्येक संदर्भ मिळतात.चिनी प्रवासी ह्युऑन त्सुंग प्रवासवर्णनात गोरवंशीय राजाचा उल्लेख आहे.गोरवंशीयांची गोरबोली स्वतंत्र बोली प्राचीन काळापासून आहे.

**e) अन्य ऐतिहासिक संदर्भः**

माळवा प्रांतात - दिगा नाईक माजमा नाईकाचे राज्य होते.

राजपूत वंशच मूळात शक हूण पासून निर्माण झाला आहे. ९ व्या शतकानंतरच राजपूत वंशाचा संदर्भ इतिहासात सापडला पूर्वी हा वंश नव्हता.

गोर वंशाचा इतिहास इ.स.पू. ३००० ते ७००० वर्षापुर्वीचा प्राचीन इतिहास आहे.

**f) बौध्द धर्म विदेशात घेऊन जाण्यासाठी बंजाराचे मोठे योगदान-**

बुध्द जीवन चित्रावली या आचार्य नाराणजी गोयंकाच्या ग्रंथात संदर्भ आढळतो की, **“**बौध्द धर्म सर्व प्रथम बौध्द देश अफगाणिस्तान मध्ये घेऊन जाण्याचा सन्मान बंजारांना प्राप्त होतो.**”** तपसू - भिलू नामक बंजारा तांड्याच्या व्यापाऱ्याला गौतम बुध्दाने बौध्द धर्माची प्रथम दिक्षा दिली. ब्रम्हदेशात तपसू भिलू ने बौध्द धर्माचा प्रचार केला आणि तिथे स्तूपही बनविला. बुध्द ने बौध्द धर्मप्रचारासाठी भिक्षूंना बंजारा तांड्यासोबत (लदेणी) पाठविले. शॉर्टकट मार्ग फक्त बंजारांनाच माहित होता.२७ बौध्द धर्म विदेशात घेऊन जाण्यासाठी बंजाराचे महत्वपूर्ण योगदान आहे यावरुन स्पष्ट होते.

प्रत्यक्ष बौध्द जातकातही बंजारा जातक आहेत. गौतम बुध्दाने ज्या पाच लोकांना धम्मादिक्षा दिली होती त्यात २ बंजारा लमाण गणातील होते. भिकू,मेराम,संगा, भिकणी ही नावेही धम्म व धम्म प्रसारकाशी आलेला संबंध दाखवितात.२८

**निष्कर्ष :**

१) गोर बंजारा संस्कृतीच्या ऐतिहासिक पार्श्वभुमीचा आभ्यास केला असता बंजारा समाजावर प्राचीन हडप्पा व मोहंजोदारो संस्कृतीचा प्रभाव असल्याचे सिद्ध होते.

२) बंजारा लोकसाहित्यामध्ये बंजारा लोकगीतांची परंपरा प्राचीन काळापासून असून ही लोकगीते जीवनाच्या प्रत्येक कर्मासोबत जोडलेली आहे. गोरबंजारा संस्कृती अत्यंत प्राचीन असून याचा उद्भव हडप्पा, मोहेंजोदारो तथा सिंधू घाटी संस्कृतीत असल्याचा आढळून आला.

३) गोर संस्कृतीचा इतिहास सिंधू घाटीत दडलेला असून उत्खननात सापडलेले ३१x२३x८ feet चे तलाव हे आंघोळीसाठीचे महास्नानगृह नसून गोरचे लदेणी कलेल्या बैलाला पाणी पिण्यासाठी वापरले जात. या तलावाच्या पायऱ्या समांतर असल्याने त्यांना पाणी पिण्यास सोपे जात. बैलाच्या पाठीवर लदेणी वजनदार असल्याने माल बारंवार उतरविणे,चढविणे कठीण असायचे त्यासाठी ही व्यवस्था होती. या तलावाच्या शेजारी १५०x७५ feet धान्य साठविण्याचे कोठार सापडले. शेजारीच एक गोदी सापडली. गोर बंजारे यांनी धान्य साठवणूक, वितरण व लदेणी सोपी जावी या दृष्टीने ही रचना केल्याचे आढळते. गोरबंजारा लदेणी आणि बार्टर पद्धतीने व्यापार बैल,उंट,घोडे च्या साहाय्याने करत. विदेशाशी त्यांचा व्यापार समुद्र व नद्यांमधुन आंतरराष्ट्रीय स्तरावर चालत असल्याचे आढळून आले.

४) सिंधू घाटी संस्कृतीच्या हडप्पा, मोहेंजोदारो उत्खननात सापडलेले मणख्या व हरपणी या बंजारा पुरुष व स्त्रीयाच्या मूर्त्या, बैलाच्या पाठीवर समान लादलेल्या मूर्त्या, सामुहिक नृत्य करणाऱ्या महिलाच्या मूर्त्या सापडल्या. तसेच कळस, धडधडी, चोखो, अलंकार, आभूषणे घरेलू साहित्य इत्यादी आजही गोर बंजारा तांड्यात वापरतांना आढळतात.

५) गोरबंजारे निसर्गपूजक आहेत. गोधन व बैलाची पूजा करतात. चोखो, कळस, धडधडी या प्रथा आजही गोरसंस्कृतीत आढळतात. प्राचीन काळात गोरबंजारा स्त्री-पुरुष अलंकाराचे शौकीन होते. मोहंजोदारो उत्खनातून प्राप्त गहने आणि आभूषणे आजही बंजारा स्त्रीयांच्या गळ्यात सुरक्षीत आहेत सिंधू घाटीची वेशभूषा आजही बंजारा नारी घालते. हातात दंडापर्यंत पांढऱ्या बांगड्या जगात फक्त बंजारा स्त्रीच घालते जे सिंधू घाटी उत्खननात सापडले. सामूहिक नृत्य करणाऱ्या बंजारा स्त्री वेशभूषेच्या मूर्त्या उत्खननात सापडल्या. होळी तसेच इतर सण उत्सवात बंजारा नारीच गोल फेर धरुन सामूहिक नृत्य करताना आजही आढळते. दिवाळीच्या वेळी कुंवाऱ्या मुली गोधन पूजा करतात व आमावस्येच्या रात्री हातात दिवा घेऊन आशीर्वाद मागतात. गोरबंजारा खाद्यसंस्कृतीत दळीया बाटी, सळोई, घुगरी, चावळ, पातळी बाटी, चिकन करी, लापड, गहू इ. अन्नपदार्थाचा समावेश होतो. सिंधू पूर्व काळापासून गोरबोली अफगाणिस्तान, सिंध, पंजाब, गुजरात, काठेवाडा, हडप्पा आणि मोहंजोदारो मध्ये गोरबंजारे बोलतात. गोरवंशीय लोकजीवन जगात सर्वत्र एकमेव अद्वितीय आणि सारखे आहे. गोरबंजारा लोकजीवन व सिंधू घाटीतील लोकजीवन सारखेच असून वैशिष्टपूर्ण असल्याचे दिसून येते.

६) सिंधू संस्कृतीच्या मूळच्या आद्यवासी गोर बंजारावर सिंधू घाटीत गोर बंजारा व्यापारात व्यस्त असताना शस्त्रधारी आर्यन, पार्सियन, कुशाण, हुणस यांनी सतत आक्रमणे करुन गोर बंजाराचा इतिहास नष्ट केला. तेथील लोकांची निर्घृण हत्या केली. गोर बंजारावर खूप अन्याय झाला. त्यानंतर ते जगात इतरत्र पसरले.

७) छोटी सादडी व मंदासौर येथे सापडलेले शिलालेखात गोर राजे असल्याचा स्पष्ट उल्लेख आढळतो. सापडलेल्या नाण्यात एका बाजूला वृषभ बैलाचे शिंग व दुसऱ्या बाजुला गोर विजय लिहिले आहे. प्राचीन वास्तू , प्राचीन वांड्.मय, शिलालेख,नाणी, गोर प्रांत, गोर पहाड, लोकसाहित्य इत्यादी मध्ये गोर बंजारे राज्य करीत असल्याचे पुरावे आढतात. उदयपूर मध्ये राजा सोम गोर, राजा यशोगुण, बंगालमध्ये राजा गोपीचंद तसेच त्यांच्या वंशातील राजा शंशाक, मध्य प्रांतात गोर सेनापतीने ७०० वर्षे राज्य केले. अजमेरचे गोर राजे शूरता वीरता करीता प्रसिध्द होते. बौध्द धर्म विदेशात घेऊन जाण्यासाठी बंजाराचे मोठे योगदान आहे. प्राचीन काळात गोरवंशीय राजे असल्याचे अनेक पुरावे आढळतात.

८) प्राचीन कालीन गोर बंजारा संस्कृतीचा इतिहास इ.स.पू. ३००० ते ८००० वर्षा पूर्वीचा असून याची नाळ सिंधू संस्कृतीशी जोडली गेली आहे. गोर बंजारांच्या प्राचीनकालीन लोकगीते, साखी, केळांवट, धावलो यात असलेला हडप्पा व मोहेदारो उत्खननात सापडलेले साहित्य यावरुन गोरबंजारा जमात सिंधू संस्कृतीतील मूळ असल्याचे सिध्द होते. गोरबंजारा लोकगीते, लोकजीवन, वेशभूषा, खाद्यसंस्कृती, घरेलू वापरातील वस्तू, नृत्य, उत्सव, लदेणी, व्यापार, आणि सिंधू घाटी हडप्पा व मोहंजोदारो उत्खननात सापडलेले सर्व पुरावे यावरुन गोरबंजारा संस्कृती आणि सिंधू घाटातील संस्कृती यात मोठ्या प्रमाणात साम्य आढळून आले. यावरुन गोरबंजारा संस्कृती व सिंधू घाटातील संस्कृती एकच असल्याचे सिद्ध होते. प्राचीन कालीन गोरबंजारा संस्कृतीची वैभवशाली, गौरवशाली परंपरा आहे.

## संदर्भ :


१) राठोड प्रकाश, बंजारा समाज साहित्य आणि संस्कृती गोर बंजारा इतिहास आणि लोकजीवन एक परिक्षण (P-92)

२) Modi Viraj Vishwas and Dr S.S.pandey, बंजारा जनजातीय लोगोंका इतिहास, Research scholar, Swami Vivekanand and university Sagar, Review of Research Vol-7/ISSUE-5/Feb-2018

३) इकबाल, बंजारा लोक संस्कृती : एक अवलोकन, शोधर्थी P.H.D हिंदी कुरुक्षेत्र विश्वविद्यालय कुरुक्षेत्र हरियाना भारत Interanational Journal of Hindi Research Volume-3 Issue-6 Nove-2017 (p-15-18) ISSN:2455-2232

४) Rathod U.C., Minor Research project, The Historical Study of Gor Banjra Life and culture- Special Referance and Marathwada Region U G C. - F No. 23280/2012 (WRO).

५) राठोड मोतीराज, प्राचीन बनजारा समाजव्यवस्था, प्रकाशक बी.के.नाईक पद्मश्री रामसिंग भानावत मेमोरियल ट्रस्ट ३०२ ठाणे पूर्व (जून-२०१३).

६) राठोड एम, गोर बनजारा जनजाति का इतिहास, विद्या प्रकाशन, कानपुर पृ.क्र.१७

७) राणे य.श. व कर्वे चि.ग.सुलभ विश्वकोष भाग-2 (P-30)

८) Naik Ramesh, Deparement of Geography, Osmania University Hydrabad (India), Banajar (lambada) Community in India some issues, Research review international journal of Multidisciplinary Vol-2 issue 8 Aug 2017

९) कित्ता ५, पृष्ठ क्र.११

१०) मुलाखत, राठोड अलका राजकुमार, रा.रेखानाईक तांडा पो.नित्रुड ता.माजलगाव जि.बीड

११) कित्ता ५, पृष्ठ क्र.११

१२) कित्ता ५, पृष्ठ क्र.१३

१३) राठोड एम, गोरमाटी, प्रकाशन सांस्कृतिक साहित्य परिषद, संजय नगर औरंगाबाद पृ.क्र.१३

१४) कित्ता ५, पृष्ठ क्र.८८,९२,१०७,११२,५६.

१५) राठोड रविराज, राजबंजारा मॅगझिन, (२०१९).

१६) कित्ता ४, पृष्ठ क्र.७

१७) मार्डीकर मदन - प्राचीन भारताचा इतिहास

१८) कित्ता ५, पृष्ठ क्र.७२,८१

१९) कित्ता १, पृष्ठ क्र.८६

२०) कित्ता ५, पृष्ठ क्र.७

२१) Rathod Tanaji G.,Socio-Economic issues of Banjara Community:Redefined Strategy for Development (2012)

२२) राठोड प्रकाश, बंजारा समाज साहित्य आणि संस्कृती, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.
२३) कित्ता ८, पृष्ठ क्र.३५
२४) औझा गौरीशंकर, निबंध संग्रह,परिशिष्ट ८७ ते ९१
२५) मुलाखत, राठोड तुकाराम जेमा, रा.रेखानाईक तांडा पो.नित्रुड ता.माजलगाव जि.बीड
२६) कित्ता ७, पृष्ठ क्र.३०
२७) कित्ता ५, पृष्ठ क्र.११९
२८) कित्ता १, पृष्ठ क्र.८४



**श्री राजकुमार तुकाराम राठोड**
**सहशिक्षक, रीसर्च स्कॉलर, एम.ए.एम.एड.सेट (शिक्षणशास्त्र) जि.प.प्रा.शाळा लवुळ क्र.१ ता.माजलगांव जि.बीड, महाराष्ट्र.**

LBP PUBLICATION